दै. महाराष्ट्र टाइम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

बुधवार, दिनांक - 9 MAR 2016




शिवाजी विद्यापीठात आयोजित मेळाव्यात बोलताना जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी. शेजारी वर्षा विद्या विलास, अभिनेत्री पूजा पवार, बाळासाहेब झिंजाडे, अमोल मडामे, डॉ. ए. एम. गुरव, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, जिल्हा पोलिस अधीक्षक प्रदीप देशपांडे, नागरबाई शिंदे, डॉ. वासंती रासम, डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. गोरखनाथ कांबळे.

# स्त्री-भ्रूणहत्येचा कलंक पुसून पुरोगामित्व जपा

**जिल्हाधिकारी डॉ. सैनी यांचे आवाहन**

कोल्हापूर : 'कोल्हापूर जिल्ह्यावरील स्त्री-भ्रूण हत्येचा कलंक पुसण्याची जबाबदारी सर्वच नागरिकांची आहे. कोल्हापूरची पुरोगामी परंपरा अबाधित राखण्याच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे,' असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. अमितकुमार सैनी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्रात आयोजित महिला मेळाव्यात ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठ, महिला आर्थिक विकास महामंडळ, कोल्हापूर, कृषि विज्ञान केंद्र, तळसंदे, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य आणि ज्योती स्कील्स् अँड सर्व्हिसेस यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त बचत गटातील महिलांचा मेळावा लोककला केंद्रात आयोजित केला होता. त्यावेळी ते बोलत होते.

जिल्हाधिकारी डॉ. सैनी म्हणाले, 'बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक बांधिलकी जोपासणे आवश्यक आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाचे नाव आता 'महिला आर्थिक, सामाजिक विकास मंडळ' होणे अधिक संयुक्तिक ठरेल.'

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, 'महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचत गटांच्या माध्यमातून प्रभावी काम सुरू आहे. स्त्रीशक्ती समाजाची प्रबळ प्रेरक शक्ती आहे. या शक्तीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्यांच्यातील कौशल्यांचा विकास होणे आवश्यक आहे. त्या कौशल्यांच्या आधारे समाजाची प्रगती करण्यासाठी योगदान देण्यास त्यांनी सज्ज होण्याची गरज आहे.'

जिल्हा पोलिस अधीक्षक प्रदीप देशपांडे म्हणाले, 'पोलिस मुख्यालयात आजच महिला दिनानिमित्त 'प्रतिसाद' हा अॅप महिलांच्या सुरक्षिततेसाठी तयार केला आहे. त्याचा महिलांनी योग्य वापर करावा. कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडू नये. मुला-मुलींना समाजात होणाऱ्या त्रासापासून संरक्षण मिळण्याबरोबरच गरीब महिलांना मोफत कायदेशीर सल्ल्याची, समुपदेशनाची सोय उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

बचत गटांच्या माध्यमातून उत्कृष्ट कार्य केलेल्या महिलांना यावेळी पारितोषिके देण्यात आली. 'माविम'चे जिल्हा समन्वय अधिकारी बाळासाहेब झिंजाडे यांनी प्रास्ताविक केले. प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही. एन.शिंदे, डॉ.डी.के. गायकवाड, डॉ.गोरखनाथ कांबळे, डॉ.वासंती रासम, सौ.अनिता शिंदे, डॉ.ए.एम. गुरव, अमोल मडामे, वर्षा विद्या विलास, अभिनेत्री पूजा पवार उपस्थित होत्या. डॉ. सुमन बुवा यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दै. पुण्य नगरी बुधवार दिनांक 9 MAR 2016




कोल्हापूर : जागतिक महिला दिनानिमित्त बचत गटातील महिलांचा मेळाव्यात बोलताना जिल्हाधिकारी डॉ.अमित सैनी. सोबत पुजा पवार, प्रदीप देशपांडे, नागरबाई शिंदे आदी.

# जिल्ह्याला लागलेला स्त्रीभ्रूण हत्येचा कलंक पुसण्याचा प्रयत्न करावा

## जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांचे महिलांना आवाहन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

बचत गटांच्या माध्यमातून महिला राजकारणात येत आहेत. त्यांची आर्थिक, सामाजिक, राजकीय उन्नती होत आहे. महिलांमध्ये आपले हक्क, अधिकार याबाबत जाणीव जागृती होत आहेत. बचत गटांच्या माध्यमातून क्रियाशील झालेल्या महिलांनी सामाजिक जाणिवेतून जिल्ह्याला लागलेला स्त्रीभ्रूण हत्येचा कलंक पुसण्यासाठी प्रयत्न करावेत, असे सांगून जिल्ह्यातील स्त्री/पुरुष लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी बचत गटांच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांनी केले.

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, कृषी विज्ञान केंद्र, तळसंदे, नशाबंदी मंडळ, कोल्हापूर आणि ज्योती स्किल्स अँड सर्व्हिसेसतर्फे ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त बचत गटातील महिलांचा मेळावा शिवाजी विद्यापीठाच्या लोककला केंद्र येथे जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा पोलीस अधीक्षक प्रदीप देशपांडे, अभिनेत्री पूजा पवार आणि नागरबाई बाबूराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थित आयोजित करण्यात आला होता.

कोल्हापूर जिल्ह्याला पाणीटंचाई, चाराटंचाई नाही. नैसर्गिक वरदानांनी नटलेला हा जिल्हा आहे. पण, या जिल्ह्याला स्त्रीभ्रूण हत्येचा कलंक लागला आहे, असे सांगून जिल्हाधिकारी सैनी म्हणाले, पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी असलेल्या राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये कोल्हापूर जिल्ह्याचा समावेश आहे. हा कलंक पुसण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बचत गटांच्या माध्यमातून संघटित झालेल्या सामाजिक उत्तरदायित्वाच्या जाणिवेतून योगदान द्यावे. पोलीस अधीक्षक प्रदीप देशपांडे म्हणाले, समाजातील महिला जेव्हा अन्याय, अत्याचार, शोषण याविरुद्ध लढा देत असतात, त्यावेळी त्यांनी स्वतःला दुर्बल, एकाकी समजू नये. पोलीस विभागाबद्दलची भीती दूर करून पोलिसांची मदत घ्यावी.

यावेळी कुलसचिव डी. एन. शिंदे, नशाबंदी मंडळाच्या सरचिटनीस वर्षा विलास, राज्य संघटक अमोल मडामे, डॉ. वसंती रासम, अनिता देवानंद शिंदे, महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक बाळासाहेब झिंजाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. पेठवडगावच्या तनुजा मुल्लाणी, जयश्री शेलार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक एम. जी. कुलकर्णी, जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे, नशाबंदीचे जिल्हा संघटक सुरेश सकटे, ज्योती स्किलचे सुदेश देशपांडे यांच्यासह नाबार्डचे जिल्हा विकास अधिकारी नंदू नाईक, जयवंत जगताप यांच्यासह जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या सदस्या हजारोंच्या संख्येने उपस्थित होत्या.

दै. पुढारी बुधवार, दिनांक - 9 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्त्रीभ्रूण हत्येचा कलंक पुसण्यासाठी प्रयत्नांची गरज

## जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी : शिवाजी विद्यापीठात बचतगटांच्या महिलांचा मेळावा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

बचतगटांच्या माध्यमातून महिला राजकारणात येत असून त्यांची आर्थिक, सामाजिक, राजकीय उन्नती होत आहे. बचत गटांच्या माध्यमातून क्रियाशील झालेल्या महिलांनी सामाजिक जाणिवेतून जिल्ह्याला लागलेला स्त्रीभ्रूण हत्येचा कलंक पुसण्यासाठी प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ लोककला केंद्रात माहिला आर्थिक विकास महामंडळ, शिवाजी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र तळसंदे, नशाबंदी मंडळ, कोल्हापूर आणि ज्योती स्कील्स अँड सर्व्हिसेस जागतिक माहिला दिनानिमित्त बचतगटातील माहिलांच्या मेळाव्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्रभारी कुलसचिव डॉ.व्ही. एन.शिंदे, अभिनेत्री पूजा पवार, श्रीमती नागरबाई बाबूराव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. सैनी म्हणाले, जिल्ह्यात पाणीटंचाई, चाराटंचाई नाही. नैसर्गिक वरदान असलेला जिल्ह्यास स्त्रीभ्रूण हत्येचा कलंक लागला आहे. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण कमी असलेल्या दहा जिल्ह्यामधे कोल्हापूर समावेश आहे. हा कलंक पुसण्यासाठी माहिलांनी अर्थिक विकास महामंडळाच्या बचतगटांच्या माध्यमातून योगदान द्यावे. काही ठिकाणी माहिला बचतगट पुरुषांच्या नेतृत्वाखाली चालविले जात आहेत, ही चुकीची गोष्ट आहे. त्यासाठी माहिलांच्या सक्षमीकरणासाठी अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. पोलिस अधीक्षक प्रदीप देशपांडे म्हणाले, महिलांना ५० टक्क्यांहून अधिक आरक्षण दिले असतानादेखील त्या अन्याय, अत्याचाराच्या बळी ठरत आहेत. याच्याविरुद्ध लढा देणाऱ्या महिलांनी स्वतःला दुर्बल, एकाकी समजू नये. पोलिस खात्याबद्दलची भीती, गैरसमज दूर करून त्यांची मदत घ्यावी. महिलांनी कायदेविषयक सल्ला घेऊन सक्षमपणे व स्वाभिमानाने उन्नती, विकास साधावा. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, महिलांच्या सक्षमीकरणासाठी बचतगटांच्या माध्यमातून प्रभावीपणे काम सुरू आहे. स्त्रीशक्ती समाजाची प्रबळ प्रेरक शक्ती आहे. या शक्तीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी त्यांच्यातील अंगभूत कौशल्याचा विकास होणे आवश्यक आहे.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात जागतिक माहिला दिनानिमित्त आयोजित बचतगटातील माहिलांच्या मेळाव्यात बोलताना जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी. वर्षा विलास, अमोल मडामे, पूजा पवार, डॉ. एम. ए. गुरव, डॉ. व्ही.एन. शिंदे, जिल्हा पोलिस अधीक्षक प्रदीप देशपांडे, श्रीमती नागरबाई शिंदे, डॉ. वासंती रासम आदी. (छाया : पप्पू अत्तार)

यावेळी मातोश्री नागरबाई बाबूराव शिंदे यांचा 'आदर्शमाता' म्हणून गौरव करण्यात आला. तसेच जिल्ह्यातील सहा लोक संचलित साधन केंद्रांचा उत्कृष्ट कामगिरीबद्दल सत्कार करण्यात आला. पेठ वडगावच्या तनुजा मुल्लानी, जयश्री शेलार यांनी प्रातिनिधीक मनोगते व्यक्त केले. बाळासाहेब झिंजाडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी सौ. अनिता देवानंद शिंदे, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक, एम. जी. कुलकर्णी, जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे, नशाबंदी मंडळाच्या सरचिटणीस वर्षा विलास, राज्य संघटक अमोल मडामे, जिल्हा संघटक सुरेश सकटे, ज्योती स्किलचे सुदेश देशपांडे, नंदू नाईक, जयवंत जगताप, प्रा. डॉ. वसंती रासम, बाळासाहेब झिंजाडे यांच्यासह महिला बचत गटाच्या सदस्या उपस्थित होत्या.



### 'प्रतिसाद आस' ॲपचा वापर करा...

कोल्हापूर पोलिस दलाने नुकतेच 'प्रतिसाद आस' हे मोबाईल ॲप्लिकेशन सुरू केले आहे. महिलांना ज्यावेळी असुरक्षित वाटत असेल, त्यावेळी या मोबाईल ॲप्लिकेशनचा वापर करावा. याच्या माध्यमातून मोबाईल लोकेशन ताबडतोब कंट्रोल रूमला समजणार आहे. त्यानंतर संबंधित परिसरात असणाऱ्या पोलिस ठाण्याचे बीट मार्शल त्या ठिकाणी जाऊन पाहणी करतील. 'सोशल इमर्जन्सी' या की वर्डचा वापर करून तत्काळ पोलिसांची मदत घ्यावी. हे ॲप जास्तीत-जास्त महिलांनी मोबाईलवर अपलोड करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक प्रदीप देशपांडे यांनी केले.

### बचतगटांच्या पुढाकाराची गरज

महिला सक्षमीकरणासाठी बचत गटाने पुढाकार घेण्याची गरज आहे. पुढील वर्षभरात जिल्ह्यातील स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तर वाढविण्यासाठी सामाजिक बांधिलकी म्हणून प्रशासनाच्या वतीने बचतगटांच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. सैनी यांनी सांगितले.

दै. सकाळ बुधवार . दिनांक 9 MAR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लढून अधिकार मिळवण्यास सज्ज राहा

## उत्तम कांबळे यांचे महिलांना आवाहन : विद्यापीठात व्याख्यान

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत महिलेचे रूपांतर 'आयटम गर्ल' व 'डेकोरेटिव्ह मटेरियल'मध्ये झाले आहे. महिलांनी वेळीच सावध होऊन जे पेलणारे आहे, ते लढून मिळविण्यासाठी सज्ज राहायला हवे. 'पॅकिजिंग' व्यवस्थेत बांधून ठेवणारे नाकारून मानसन्मानाने जगावे, असे आवाहन 'सकाळ'चे संपादक-संचालक उत्तम कांबळे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग, मास कम्युनिकेशन विभाग व महिला वसतिगृहातर्फे महिला दिनानिमित्त आयोजित 'जागतिकीकरणाचा महिलांवरील परिणाम' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. सुमारे तासाभराच्या भाषणात त्यांनी महिलेची बदललेली रूपे मांडत तिला मिळालेल्या हक्कांबाबत नेमकेपणाने उपस्थितांशी संवाद साधला. या वेळी त्यांचा राज्य शासनाचा लोकमान्य टिळक पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांच्या हस्ते सत्कार झाला. अध्यक्षस्थानी डॉ. निरंजना मुळीक होत्या. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यक्रम झाला.

श्री. कांबळे म्हणाले, "मानवाच्या उत्क्रांतीचा विचार करता माणसाचे अवयव कालांतराने 'डेकोरेटिव्ह' होत गेले. महिलांचा निसर्गाशी संवाद सुरू झाला. चित्र, शब्द, संगीत व



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात वृत्तपत्रविद्या, संवादशास्त्र व मास कम्युनिकेशनतर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे उद्‌घाटन रोपट्यास पाणी घालून करताना प्रा. डॉ. रूपा शहा. शेजारी "सकाळ"चे संपादक-संचालक उत्तम कांबळे, डॉ. निशा पवार, डॉ. निरंजना मुळीक.

शेतीचा शोध महिलांनी लावला. महाभारतापर्यंत मुलांची ओळख आईच्या नावाने होती. पुढे बापाच्या नावाने मुलांची ओळख रूढ झाली. कोणत्याच धर्मग्रंथाने महिलांची दखल घेतली नाही. महिला पापी आहे, असे सांगितले जाऊ लागले. यज्ञ, मडकी, सूर्यातून मुलांचा जन्म होत असल्याचे सांगत महिलेची ओळख नष्ट करण्याचा प्रयत्न झाला. आर्यांच्या काळात बहुपत्नीत्वाची प्रथा सुरू झाली. महिलांना शिक्षण, मालमत्तेच्या अधिकारापासून दूर ठेवण्यात आले. त्यांनी कोणताच अधिकार मागू नये म्हणून त्यांचे बालविवाह करण्यात येऊ लागले. विधवा महिलांचे केशवपण केले जाऊ लागले."

या प्रसंगी दिलासा संस्थेच्या डॉ. रूपा शहा यांनी 'महिला सक्षमीकरण - नवी दिशा, नवी आव्हाने' विषयावर मार्गदर्शन केले. श्वेता किल्लेदार हिने बनविलेल्या 'यस आय ब्लीड' या लघुपटाचा प्रीमिअर शो झाला. चैतन्य डोंगरे व सुशांत पाटील यांनी बनविलेला 'हॉस्टेल लाइफ' व शीतल माने यांचा 'स्वयंसिद्धा' लघुपटाचे सादरीकरण झाले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी संयोजन केले. जयश्री देसाई हिने सूत्रसंचालन केले.

**"जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत हक्क, स्वातंत्र्य जरूर मिळते. पण, दुसरीकडे कर्मठ व्यवस्था याच अधिकारांची पायमल्ली करण्यासाठी सज्ज होते. महिलांना या प्रक्रियेत आपण कोणासाठी काम करतो, हे कळायला हवे."**
**- उत्तम कांबळे,**
संपादक-संचालक 'सकाळ'